N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): नाशिक ग्रामीण **P.S.**(ठाणे): जयखेडा **Year** (वर्ष): 2022
 **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0056 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 27/03/2022 03:49 बजे

2. 

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
 1. **Day**(दिवस): शनिवार **Date From** (दिनांक पासून): 26/03/2022
 **Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To** ( दिनांक पर्यंत): 26/03/2022
 **Time From** (वेळेपासून): 16:05 बजे
 **Time To** (वेळेपर्यंत): 16:29 बजे

 (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
 **Date** (दिनांक ): 27/03/2022 **Time** (वेळ): 02:57 बजे

 (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
 **Entry No.** (नोंद क्र.): 002 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 27/03/2022 02:57 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
 1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 16 किमी
 **Beat No.** (बिट क्र.):
 (b) **Address** (पत्ता): नामपुर पोलीस चौकी येथील,पार्किंगदुरक्षेत्र नामपूर , नामपूर ,सटाणा

 (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
 **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
 **District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
 (a) **Name** (नाव): संदिप अशोक छल्लारे
 (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
 (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
 (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
 (f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
 **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
 (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
 ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

 (h) **Address** (पत्ता):



Scanned with CamScanner

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आदर्श नगर हिरापुर रोड ,नविन नाका हनुमान मंदिराजवळ,चाळीसगाव,चाळीसगाव,चाळीसगांव , जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आदर्श नगर हिरापुर रोड ,नविन नाका हनुमान मंदिराजवळ,चाळीसगाव,चाळीसगाव,चाळीसगांव , जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-7972597933

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जगन्नाथ लाला महाजन | | | 1. जायखेडा पोलीस ठाणे,सटाणा, जयखेडा,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत<br>2. रो-हा नं26,मानवपार्क सोसायटी मालेगाव कम्प,चर्चच्या पाठीमागे एकनाथ बाबाच,पुतळ्याजवळ,मालेगाव, मालेगाव ,जयखेडा,नाशिक ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार

कम्प-ाक 27/03/2022 माझे नाव संदिप अक छल्लारे, वय 32 वर्षे, व्यवसाय-मजूरी, रा. 76, आदर्श नगर, हिरापूर रोड, नविन नाका, हनुमान मदिराजवळ, 40गाव, ता. 40गाव, जि. जळगाव, मोबाईल नं. 7972597933. मी समक्ष हजर राहून तक्रार लिहून देतो की, मी वरील ठिकाणी आई मंदाकिनी अशोक छल्लारे वडील अशोक सोनू छल्लारे अशांसह एकत्र राहतो. माझे वडीलांचे पेंशन तसेच मी मजूरी करून कुटूंबाचा निर्वाह भागवितोमाझे लग्न दि.26.07.2020 रोजी रिती-रिवाजाप्रमाणे कुपखेडा येथील मयुरी सुनिल माळवाळ हिच्याषी झाले होते, सात महिने आमचा संसार सुखाने सुरू होता, परंतू सात महिन्यानंतर आमचेत मतभेद झाल्याने माझ्यात व पत्नी मयुरी मध्ये वादविवाद झाला. म्हणून पत्नी दि.26.02.2021 रोजी तिचे माहेरी कुपखेडा, ता. सटाणा जि. नाशिक येथे निघुन गेली. माहेरी आलेनंतर दि.07.03.2022 रोजी पत्नी मयुरी हिने माझे, आई मंदाकिनी, वडील अशोक, दोन्ही बहिनी शारदा उर्फ गुडडी व मनिषा अषांविरूध्द जायखेडा पोलीस ठाणे येथे 498 अ प्रमाणे गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास जायखेडा पोलीस ठाणे अंतर्गत नामपूर पोलीस चौकीचे पोलीस हवालदार जगन्नाथ महाजन यांचेकडे होता. सदर गुन्हयाच्या तपासकामी महाजन हवालदार यांनी मला फोन करून नामपूर पोलीस चौकी येथे बोलविले होते, म्हणून दि. 11 मार्च, 2022 रोजी नामपूर पोलीस चौकी येथे येवून महाजन हवालदार यांना भेटलो. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, तुमच्याविरूध्द 498 अ प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून सदर गुन्हयातून तुमच्या दोन्ही बहिनींचे व आईचे नाव कमी करण्यासाठी मला 40 हजार रूपये दया. त्यानंतर माझे पाहूने विकास चव्हाण यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9579100200 वरून पोलीस हवालदार महाजन साहेब यांना फोन करून रक्कम कमी करण्याबाबत सांगितले असता हवालदार महाजन यांनी गुन्हयातून माझे आईचे नाव देखील कमी करतो पण तुम्हाला सर्व मिळून 40 हजार रूपये दयावे लागतील असे सांगून लाचेची मागणी केलेली आहे. मला त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी अँन्टी करप्षन ब्युरोचा टोल फ्रि क्रमांक 1064 वर फोन केला असता सदरचा फोन मुंबई अँन्टी करप्शन ब्युरो, येथे लागला त्यांना मी सविस्तर हकिगत सांगितली, तेव्हा त्यांनी मला सांगितले होते की, तुम्हाला आमचे अधिकारी फोन करतील तेव्हा त्यांचेषी सविस्तर बोलून घ्या. त्यानंतर मला नाशिक अँन्टी करप्शन ब्युरो, ब्युरोचे डीवायएसपी भामरे साहेब यांचा त्यांचा मोबाईल नं.9518313832 यावरून फोन आला व त्यांचेशी



Scanned with CamScanner

बोलणे झालेनंतर त्यांनी मला सांगितले की तुम्हाला नंदुरबार डीवायएसपी चौधरी साहेब यांचा फोन येईल, असे सांगितलेनंतर मला डीवायएसपी चौधरी साहेब यांचा 9823319220 या मोबाईल नंबर वरून फोन आला असता त्यांनाही मी सर्व हकीगत सांगितली, त्यानंतर आज दिनांक 26/03/2022 रोजी सकाळी नंदुरबार अँन्टी करप्शनचे पोलीस निरीक्षक वाघ साहेबांषी फोनवर बोलणे केले असता त्यांनी मला सांगितले की, आपण ज्या लोकसेवकांविरूध्द तक्रार देणार आहात ते आज रोजी कर्तव्यावर येणार आहेत किंवा कसे? याबाबत विचारले असता मी हवालदार महाजन यांचेशी फोनवर बोलणे करून ते डयुटीवर हजर राहणार असल्याने वाघ साहेब यांना नामपूर ता. सटाणा जि.नाषिक येथे येण्याची विनंती केली असता वाघ साहेब, दोन पंच व अँन्टी करप्शन ब्युरो,, नंदुरबारचे सर्व पथक आज रोजी माझे विनंतीवरून नामपूर ता. सटाणा जि. नाशिक येथे आल्यानंतर आम्हाला वाघ साहेबांनी त्यांची व दोन्ही पंच व स्टाफची ओळख करून दिली व सदरबाबतीत लेखी तक्रार देणेबाबत सांगितले. करीता मी माझी लेखी तक्रार देत आहे. तरी माझेत व हवालदार महाजन यांचेत कोणत्याही प्रकारचा वादविवाद नाही तसेच उधार उसनवारीचा, आर्थिक स्वरूपाचा व्यवहार नाही व त्यांनी मागितलेली रक्कम ही लाचच आहे. अशी माझी खात्री झाल्याने हवालदार जगन्नाथ महाजन यांचेविरूध्द योग्य ती कार्यवाही करावी, ही नम्र विंनती. अशी लेखी तक्रार पंचासमक्ष मालेगाव नामपूर रोडवरील श्री स्वामी समर्थ दाळ मिल (फलोरींग) चे समोर दिली होती. त्यानंतर श्री वाघ साहेब यांनी पंच न.1 श्री शेख रफिक शेख चंद वय-52 वर्षे, व्यवसाय-नोकरी, शिपाई, एसटी डेपो, साक्री, रा. आदर्श नगर, राम हटेलच्या पाठीमागे, साक्री ता. साक्री जि. धुळे व पंच नं 2 श्री. सुभाश मधूकर लाडे, वय-45 वर्षे, व्यवसाय-नोकरी, सुरक्षा रक्षक,. एसटी डेपो, साक्री, रा..भोई गल्ली साक्री जि. धुळे असे दोन्ही पंच व अँन्टी करप्शन ब्युरोचा उर्वरित स्टाफ अशांची ओळख करून दिली. त्यानंतर मी दोघेही पंचांसमक्ष माझे स्वहस्ताक्षरात वरीलप्रमाणे नमुद तक्रार लिहुन दिलेली आहे. तक्रार दिल्यानंतर वाघ साहेबांनी तक्रार दोघा पंचांना वाचावयास दिली. त्यानतंर मी, दोन्ही पंच व श्री. वाघ साहेब अशांनी सहया केल्या. त्यानंतर श्री वाघ साहेब यांनी मला व पंचाना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यप्रणाली बाबतची माहिति देवून तक्रारीबाबत पडताळणी करणे आवश्यक असल्याने त्यासाठी मला व पंच अशांना पडताळणी करीता पाठविणे असल्याने अँन्टी करप्शन ब्युरोचे पोहवा/विजय ठाकरे यांनी आपलेकडील डिजीटल व्हईस रेकर्डर माझे शर्टाचे आतील बनियानला लावून शर्टाचे वरचे बटन लावून व्हईस रेकर्डर तो 14.03 वा. सुरु केला. त्यानंतर मी व पंच नं. 1 श्री शेख असे माझी हिरो कंपनीची एचएफ डिलक्स एम.एच.19 डीजी 4136 ने नामपूर पोलीस चौकी येथे पोहचलो, तसेच श्री वाघ साहेब, त्यांचा स्टाफ व पंच नं. 2 श्री लाडे असे बोलेरो खाजगी वाहन क्र. एम.एच 39 डी 0168 हिचेने नामपूर मालेगाव रोड येथून निघून नियोजनाप्रमाणे नामपूर बस स्टंडजवळ थाबले. तसेच वाघ साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे बस स्टंडजवळ येणेबाबत सुचना दिल्या.काही वेळेनंतर मी व पंच नं. 1 श्री. शेख हे यापूर्वी नियोजीत ठिकाणी नामपूर बस स्टंडजवळ आलेवर मला वाघ साहेब यांनी खाजगी वाहनात बसनेबाबत सांगून पंच नं. 1 श्री शेख यांना माझी दुचाकी नामपूर-मालेगाव रोडवरील श्री स्वामी समर्थ दाळ मिल (फलोरींग) येथे येणेबाबत सांगितले, त्यानतर पोहवा/विजय ठाकरे यांनी माझे गळयातील डिजीटल व्हईस रेकर्डर बाहेर काढुन 14.23 वाजता बंद करुन सदरचे रेकर्डर श्री वाघ साहेब यांनी त्यांचे ताब्यात घेतले. त्यानंतर श्री वाघ साहेबानी पंच नं. 1 श्री. शेख यांना पंच नं.2 श्री. लाडे यांचेसमक्ष पडताळणी कार्यवाही दरम्यान झालेली घटना विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे नामपूर पोलीस चौकी येथे पोलीस हवालदार महाजन यांची भेट घेण्याकरीता गेलो असता पोलीस हवालदार महाजन हे पोलीस चौकीत मिळुन आले. त्यावेळी तक्रारदार यांनी हवालदार महाजन यांचेशी कामाबाबत चर्चा केली असता चर्चे दरम्यान पोलीस हवालदार महाजन यानी तक्रारदार याना सांगीतले की, तुझी आई व दोन्ही बहिणी यांचे 498 अ चे गुन्हयातून नाव कमी करण्याचे मोबदल्यात हाताने इशारा करून 50 हजार रुपये देवून टाका असे सांगितले असता त्यांवर मी थोडेफार कमी करा असे सांगितले असता त्यांनी कोणत्याही प्रकारे तडजोड करण्यास नकार दिला बाबत हकिकत सांगीतली होती. त्यानंतर सदर डिजीटल व्हईस रेकर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण मी, दोन्ही पंच व वाघ साहेबांनी ऐकले असता त्यात लाच मागणी क्लिअर नसल्याने वाघ साहेब तसेच दोन्ही पंच व माझे असे सर्वानुमते पुन्हा पडताळणी करणेबाबत ठरले असता वाघ साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हईस रेकर्डर पोहवा/विजय ठाकरे यांचे ताब्यात दिले वाघ साहेब यांचे सुचनेवरुन पोहवा/विजय ठाकरे यांनी त्या डिजीटल व्हईस रेकर्डरमध्ये एक 16 जी.बी.चे नवीन सिलबंद मेमरीकार्ड टाकले. डिजीटल व्हईस रेकर्डरमध्ये व सिलबंद मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण नसलेबाबत खात्री करुन दिली. पोहवा/विजय ठाकरे यांनी डिजीटल व्हईस रेकर्डर माझे षर्टाचे आतील बनियानला लावुन ते सुरु केले ती वेळ 14.50 वाजेची होती. त्यानंतर मी व पच नं. 1 श्री शेख असे पोलीस हवालदार श्री.महाजन यांना भेटण्यासाठी नामपुर पोलीस दुरक्षेत्र येथे लाचेची पडताळणी कामी रवाना झालो. थोडयावेळाने मी व पच न. 1 असे नामपुर, बस स्टड येथे परत येवून वरिलप्रमाणे पुन्हा मी खाजगी वाहनात वाघ साहेबांसोबत बसलो, त्यांनतर पोहवा/विजय ठाकरे यांनी माझे बनियानला लावलेले डिजीटल व्हईस रेकर्डर बाहेर काढुन 15.11 वाजता बंद करुन सदरचे रेकर्डर श्री वाघ साहेब यांनी त्यांचे ताब्यात घेतले.त्यानंतर श्री वाघ साहेबानी पंच नं. 1 श्री. शेख यांना पंच नं.2 श्री. लाडे यांचेसमक्ष पडताळणी कार्यवाही दरम्यान झालेली घटना विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे नामपूर पोलीस चौकी येथे पोलीस हवालदार महाजन यांची भेट घेण्याकरीता पुन्हा गेलो असता पोलीस हवालदार महाजन हे पोलीस चौकीतच मिळुन आले. त्यावेळी तक्रारदार यांनी हवालदार महाजन यांचेशी कामाबाबत चर्चा केली असता चर्चे दरम्यान पोलीस हवालदार महाजन यांनी तक्रारदार यांना त्यांचे पाहूने श्री चव्हाण यांना फोन करण्यास सांगितले त्यात हवालदार महाजन व तक्रारदार यांचेत पैसे कमी करंणेबाबत बोलणे झाले व त्यानंतर तक्रारदार व हवालदार महाजन यांचेत बोलणे झाले असता त्यांनी पुन्हा सांगितले की, तुझी आई व दोन्ही बहिणी यांचे 498 अ चे गुन्हयातून नाव कमी करण्याचे मोबदल्यात कागदावर 40,600 रूपये लिहून दिले असता, तक्रारदार यांनी पुन्हा हवालदार महाजन यांना विचारले की, आपण कागदावर लिहून दिले ते किती रक्कम आहे त्यावर हवालदार महाजन म्हणाले की, काय एडघाल्यापणा करतो तुला समजत नाही का, त्यावर तक्रारदार म्हणाले की 40 हजार 600 रूपये का त्यावर पोलीस हवालदार महाजन यांनी हो सांगून लाचेची मागणी केली बाबत हकिकत सांगीतली होती.त्यानंतर नमूद ठिकाणी डिजीटल व्हईस रेकर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषणाची स्क्रिप्ट तयार करणे व पंचनामा करण्यासारखी परिस्थिती नसल्याने आपले सर्वानुमते ठरले की, पडताळणी व सापळापुर्व पंचनाम्याचे कच्चे टिपण घेवुन यशस्वी सापळा कारवाई झालेनंतर सदर पंचनामे व स्क्रिप्ट करण्याचे ठरले होते सदरचे व्हईस रेकर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषणात माझे, व पोलीस हवालदार महाजन यांचेत बोलणे झाले असून त्यात माझी आई, दोन्ही बहिणी यांचे नाव 498 अ च्या गुन्हयातून कमी करण्यासाठी 40,600 रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेबाबत सर्वाची खात्री झाली होती. त्यानंतर माझे व पोलीस हवालदार महाजन यांचेतील डिजीटल व्हईस रेकर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण झाले असुन सदरचे व्हईस रेकर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण हे आपण, मी स्वतः, पंच नं.1 श्री. शेख व पंच नं.2 श्री. लाडे यांचेसमक्ष श्री स्वामी समर्थ दाळ मिल (फलोरींग) मालेगाव-नामपूर रोडजवळ आपण सर्वानी ऐकले. सदर पडताळणी दरम्यान डिजीटल व्हईस रेकर्डरमधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषणाची स्क्रिप्ट माझे व दोन्ही पंचाच्या मदतीने पुन्हा ऐकून त्याची स्क्रिप्ट बनविन्यासारखी परिस्थिती नसल्याने नंतर तयार करणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच नमूद पंच साक्षीदारांसमोर केलेल्या पडताळणीमध्ये हवालदार महाजन यांनी लाच मागणी केल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानंतर पोना/देवराम गावीत यांनी डिजीटल व्हईस रेकर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले वर नमुद संभाषणाचे लपटपव्दारे हषव्हल्यू काढुन सदर हषव्हल्यू प्रमाणपत्राची प्रिन्ट जायखेडा पोलीस ठाणे येथे काढली, सदर प्रमाणपत्रावर आपण व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर डिजीटल व्हईस रेकर्डरमधील मेमरीकार्ड काढुन सदर मेमरीकार्ड एका प्लास्टिकच्या कव्हरसह एका खाकी पाकीटात घालुन त्यावर तक्रारदार श्री. संदिप छन्नारे व



पोलीस निरीक्षक ... ता. सटाणा नाशिक

पोलीस हवालदार महाजन यांचेतील दि. 26/03/2022 रोजीचे पडताळणी दरम्यानचे संभाषण असे वर्णन असलेले पंचांच्या कागदाचे लेबल लावून त्यावर दोन्ही पंच व आमचे सह्या करून सदरची पाकीट कार्यालयीन सीलने लाखेने सिलबंद करण्यात आले ते पो.निरी. वाघ यांनी ताब्यात घेतले .

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): shrikrishna bapu pardhi(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलिस ठाणे अंमलदार
जायखेडा पो.ठाणे.

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची

**Name** (नाव): shrikrishna bapu pardhi
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner

ते पोनि/वाघ यांनी ताब्यात घेतले. तसा सविस्तर पडताळणी व सापळापुर्व पंचनामा जायखेडा पोलीस ठाणे येथे करण्यात आला.माझी आई व दोन्ही बहिणी या तिघांचे नाव 498 अ चे गुन्हयातून कमी करण्याचे मोबदल्यात पोलीस हवालदार महाजन यांनी लाच म्हणुन तडजोडीअंती 40,600/- रू. लाचेची रक्कम मागणी केल्याचे दिनांक 26/03/2022 रोजी पंच साक्षीदारासमोर केलेल्या पडताळणीमध्ये स्पष्ट झाल्याने तात्काळ सर्वानुमते यशस्वी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले होते. त्यानंतर मी, आपला स्टाफ व दोन्ही पंच असे हजर होते. आपण मला दोन्ही पंच व स्टाफ अशा सर्वांना यशस्वी सापळा कारवाईबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझेकडे बचतीचे असलेल्या पैषांमधून माझे 10,000/- रूपये मी आपल्यासमोर हजर केले. त्यात 500/-रु. दराच्या वीस चलनी नोटा होत्या. सदर नोटांना आपल्या सूचनेवरुन पोना/देवराम गावीत यांनी बॅगेतून एक सिलबंद पाकीट आणि एक दिवा/टॉर्च काढून आमचे समोर ठेवला. तेव्हा सदर दिवा हा अल्ट्राव्हायोलेट दिवा आणि सिलबंद पाकीटात अँथ्रासिन पावडरची बाटली असल्याबाबत पोनि/वाघ यांनी सांगून त्यांचे गुणधर्म व वैशिष्टयांबाबत सांगितले. त्यानंतर प्रथम नैसर्गिक प्रकाशात आणि त्यानंतर आपण खाजगी वाहनाचे दरवाजे बंद करून काळा कापडने अंधार केला, त्या अंधारात अल्ट्राव्हॉयोलेट दिव्याचे प्रकाशात आपले दोन्ही पंचांचे, आपल्या स्टाफचे असे सर्वांचे हात व कपडे व मी लाच देणेकामी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या वीस चलनी नोटा तपासल्या. सर्व काही नैसर्गिक नेहमीप्रमाणे दिसून आले. त्यानंतर खाजगी बोलेरो वाहनात पूर्ववत उजेड करण्यात आला.

वरील नोटांना पोना/देवराम गावीत यांनी त्या बाटलीचे झाकण उघडून त्या बाटलीतील अँथ्रासिन पावडर कापसाच्या बोळयाने एका पांढरे कागदावर दोन्ही बाजूने क्रॉस आकाराने लावली सदर नोटा काळ्या कपडयाने वाहनात अंधार करून अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश टाकून तपासले असता, सदर नोटांवर फिकट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर पोना/देवराम गावीत यांनी सदर नोटा माझे शर्टचे पुढील डावे बाजुस असलेल्या खिशात ठेवल्या. त्यानंतर पोना/देवराम गावीत यांना सापळा पार्टीतून वगळण्यात आले. त्यानंतर आपण, आपला स्टाफ व दोन्ही पंच असे आपले खाजगी वाहनाने नामपूर-मालेगाव रोड जवळील श्री स्वामी समर्थ दाळ मिल येथुन सापळा कारवाईचे सर्व साहीत्य घेवुन 15.50 वाजता रवाना होवुन नामपूर पोलीस चौकीचे गेटजवळ 16.00 वाजता पोहचलो. त्यांनतर आपण यशस्वी सापळा कारवाईकामी मला, दोन्ही पंच व स्टाफ अशांना सापळा कारवाईच्या पुन्हा सूचना दिल्या. त्यानंतर आपण आपलेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये दोन्ही पंचासमक्ष नवीन 16 जी.बी.चे कोरे मेमरीकार्ड टाकून व्हॉईस रेकॉर्डर माझे शर्टचे आतील बनियानला लावून सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु केले. ती वेळ 16.05 वाजेची होती. त्यानंतर आपण मला, व पंच नं. 1 श्री. शेख यांना नियोजनाप्रमाणे नामपूर पोलीस चौकी येथे रवाना केले. व आमचे पाठोपाठ पोनि/वाघ, पंच नं.2 श्री. लाडे तसेच स्टाफ असे नामपूर पोलीस चौकीच्या आजूबाजूला असलेल्या घरांजवळ दबा धरुन थांबुन होते. त्यानंतर मी व पंच क्र 1 श्री शेख असे हवालदार महाजन यांना नामपूर पोलीस चौकीत भेटलो. त्यावेळी हवालदार महाजन यांनी मला थोडावेळ थांबण्यास सांगितले. त्यानंतर आमचेत कामासंदर्भाने चर्चा केली. त्यावेळी मी पोलीस हवालदार महाजन यांना ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम माझे शर्टचे उजवे खिशातून काढुन त्याचे समोर धरली असता त्यांनी ती स्विकारुन त्यांचे नाईट पॅन्टच्या पुढील उजव्या खिषात ठेवली. त्यावेळी मी लाच देण्याचा गळयातून उपरणे (रूमाल) काढून झटकण्याचा पुर्वनियोजीत इषारा केल्याने सापळा पथकातील अधिकारी, स्टाफ व पंच हे आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणीच सक्रीय होवुन आमचे जवळ नामपूर पोलीस चौकीत आले. त्यावेळी पोहवा/उत्तम महाजन यांनी पोलीस हवालदार श्री.जगन्नाथ महाजन यांचा डावा हात व पोहवा/विजय ठाकरे अशांनी पोलीस हवालदार श्री.जगन्नथ महाजन यांचा उजवा हात मनगटापासुन घट्ट पकडून ठेवले. त्यादरम्यान पोना/मनोज अहिरे यांनी वाघ साहेब यांचे सुचनेवरुन माझे शर्टचे आतील बाजूस बनियानला लावण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून आपल्या ताब्यात ठेवले. ती वेळ 16.29 वाजेची होती. त्यानंतर मला थोडे अंतरावर थांबण्यांस सांगितले. त्यानंतर आपण पोलीस हवालदार महाजन यांना माझेकडुन लाचेची रक्कम घेतांना पंच साक्षीदारासमक्ष रंगेहाथ पकडल्यानंतर सर्व कार्यवाही केल्यानंतर आपला स्टाफ, दोन्ही पंच व पोलीस हवालदार महाजन यांना घेवून आपले वरिष्ठांना फोनव्दारे संपर्क साधून जायखेडा पोलीस ठाणे कार्यालयात आलो. त्याठिकाणी आपण आपली कागदोपत्री कार्यवाही केली.

दि. 26/03/2022 रोजी श्री जगन्नाथ लाला महाजन, वय-57 वर्षे, व्यवसाय-नोकरी, सहा.पोलीस उप निरीक्षक, वर्ग-3, नेम. जायखेडा पोलीस ठाणे मुळ रा. रो-हाऊस नं. 26, मानवपार्क सोसायटी, मालेगाव कॅम्प चर्चच्या पाठीमागे, एकनाथ बाबांचा पुतळयाजवळ, मालेगाव जि. नाशिक, मुळ रा. बोरकुंड ता.जि. धुळे यांनी माझेकडुन माझी आई व दोन्ही बहिणी या तिघांचे नाव 498 अ चे गुन्हयातून कमी करण्याचे मोबदल्यात 40,600/- रुपये लाचेची मागणी करुन पैकी 10,000/- रू. लाचेची रक्कम दिनांक 26/03/2022 रोजी पंच साक्षीदारासमक्ष स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.तरी यातील श्री जगन्नाथ लाला महाजन, वय-57 वर्षे, व्यवसाय-नोकरी, सहा.पोलीस उप निरीक्षक, वर्ग-3, नेम. जायखेडा पोलीस ठाणे मुळ रा. रो-हाऊस नं. 26, मानवपार्क सोसायटी, मालेगाव कॅम्प चर्चच्या पाठीमागे, एकनाथ बाबांचा पुतळयाजवळ, मालेगाव जि. नाशिक, मुळ रा. बोरकुंड ता.जि. धुळे यांनी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाने स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी माझेकडुन लाचेची मागणी करुन ती लाच स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील संगणकावर टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणे व पाहणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

हि फिर्याद दिली सही,
दिनांक- 27/03/2022

समक्ष

(समाधान [illegible].वाघ)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार